महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ
जिल्हा शल्य चिकित्सक संवर्गातील
बदल्या /पदस्थापना...

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन आदेश क्रमांकः न्यायप्र. २०१७/प्र.क्र. १८८/सेवा-२

गो.ते.रुग्णालय इमारत संकुल,१० वा मजला,
मंत्रालय, मुंबई ४०० ००१.
तारीख: २० सप्टेंबर,२०१७

संदर्भ -

१) शासन आदेश क्रमांकः बदली-२०१७/प्र.क्र.१२३/सेवा-२, दि. ०५.०८.२०१७
२) मूळ अर्ज क्र. ७४८/२०१७ मधील मा. न्यायाधिकरणाचे दि. १०.०८.२०१७ रोजीचे आदेश.

शासन आदेश -

महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ जिल्हा शल्य चिकित्सक संवर्गातील अधिकाऱ्यांच्या बदलीने पदस्थापना करण्याबाबतचे आदेश संदर्भ क्र. १ अन्वये निर्गमित करण्यात आले आहेत. सदर आदेशानुसार डॉ. मीरा चिंचोलीकर यांची उपजिल्हा रूग्णालय, बारामती येथून वैद्यकीय अधिक्षक, ग्रामीण रूग्णालय, वाई जि.सातारा येथे बदली करण्यात आली. त्याविरूध्द डॉ. चिंचोलीकर यांनी मॅट, मुंबई येथे मूळ अर्ज क्र. ७४८/२०१७ दाखल केला आहे. मा. न्यायाधिकरणाने दि. १०.०८.२०१७ रोजीच्या आदेशानुसार डॉ. चिंचोलीकर यांची उपजिल्हा रूग्णालाय, बारामती येथून ग्रामीण रूग्णालय, वाई येथे करण्यात आलेली बदली रद्द करून त्यांना उपजिल्हा रूग्णालय, बारामती येथे पदस्थाना देण्याबाबत आदेशित केले. तसेच डॉ. चिंचोलीकर यांच्या ठिकाणी उपजिल्हा रूग्णालय, बारामती येथे नियुक्ती देण्यात आलेले डॉ. सदानंद काळे, यांच्या पदस्थापनेबाबत निर्णय घेण्याबाबत आदेशित केले. त्यानुसार खालीलप्रमाणे सुधारित आदेश निर्गमित करण्यात येत आहेत..

अ.क्र.	अधिकाऱ्यांचे नांव	दि. ०५.०८.२०१७ रोजीच्या आदेशानुसार देण्यात आलेली पदस्थापना	या आदेशानुसार देण्यात येत असलेली सुधारित पदस्थापना
१	२	३	४
१	डॉ. (श्रीमती) मीरा वसंतराव चिंचोलीकर , वैद्यकीय अधीक्षक	वैद्यकीय अधिक्षक, ग्रामीण रूग्णालय, वाई जि.सातारा	वैद्यकीय अधिक्षक, उपजिल्हा रूग्णालय, बारामती पुणे
२	डॉ. सदानंद गोपाळराव काळे,वैद्यकीय अधीक्षक	वैद्यकीय अधिक्षक, उपजिल्हा रूग्णालय, बारामती पुणे	अधिक्षक, स्त्री रूग्णालय, बारामती, जि. पुणे

२.   बदली करण्यात आलेल्या अधिकाऱ्यास त्यांच्या नवीन पदस्थापनेच्या ठिकाणी हजर होण्याकरीता तात्काळ कार्यमुक्त करण्यात यावे आणि संबंधित अधिकाऱ्याने त्यांना दिलेल्या पदस्थापनेच्या ठिकाणी त्वरीत हजर होऊन त्याबाबतचा अहवाल संचालक, आरोग्य सेवा, मुंबई व शासनास सादर करावा.

३.   सदर आदेश महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम,२००५ मधील कलम ४ (४) (दोन) आणि ४ (५) च्या तरतूदीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर आदेश तात्काळ अंमलात येतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०९१६११०८११०६१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vishnudas Pundlikrao Ghodke

Digitally signed by Vishnudas Pundlikrao Ghodke
DN: CN = Vishnudas Pundlikrao Ghodke, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Public Health Department
Date: 2017.09.20 14:33:31 +05'30'

(वि.पुं.घोडके)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१ आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
२. संचालक, आरोग्य सेवा, मुंबई
३. सहसंचालक, आरोग्य सेवा (अर्थ व प्रशासन), मुंबई
४. उपसंचालक, आरोग्य सेवा मंडळ, पुणे
५. जिल्हा शल्य चिकित्सक,सामान्य रुग्णालय, पुणे/सातारा
६. अधीक्षक, स्त्री रुग्णालय, बारामती, जि.पुणे
७. महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र -१ मुंबई / महाराष्ट्र -२ नागपूर
८.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र -१ मुंबई/ महाराष्ट्र -२ नागपूर
९.जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे/सातारा
१०. मा. मंत्री (सा.आ.) / मा.राज्यमंत्री (सा.आ.) यांचे खाजगी सचिव
११. प्रधान सचिव (सा.आ.) यांचे स्वीय सहाय्यक
१२.सर्व संबंधित अधिकारी, (संचालक,आरोग्य सेवा यांचेमार्फत)
१३. निवडनस्ती (सेवा - २)